**PRESS INFORMATION BUREAU**
**GOVERNMENT OF INDIA**
**NAGPUR**
***

| | |
|---|---|
| NAME OF NEWSPAPER | DAINIK BHASKAR |
| DATE | 22.11.2019 |
| LANGUAGE | HINDI |
| SUBJECT | Press clippings of Agrovision Dt- 22-11-19 |

# आज से 'एग्रोविजन' का शुभारंभ

**नागपुर|** रेशमबाग मैदान में आयोजित कृषि प्रदर्शनी एग्रोविजन का उद्घाटन शुक्रवार 22 नवंबर को केंद्रीय कृषि और किसान कल्याण मंत्री नरेंद्र सिंह तोमर करेंगे। कार्यक्रम की अध्यक्षता एग्रोविजन के मुख्य प्रवर्तक तथा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी करेंगे। इस अवसर पर केंद्रीय मानव संसाधन विकास, दूरसंचार राज्यमंत्री संजय धोत्रे, महाराष्ट्र के पूर्व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्य के पूर्व वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार और पूर्व ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुले उपस्थित रहेंगे। विशेष रूप से सीसीएफआई और यूपीएल समूह के अध्यक्ष रज्जूभाई श्रॉफ, राज्यसभा सांसद पद्मश्री डॉ. विकास महात्मे और रामटेक के सांसद कृपाल तुमाने, शहर के महापौर संदीप जोशी उपस्थित रहेंगे। यह प्रदर्शनी 25 नवंबर तक चलेगी।

**23 को दुग्ध उत्पादन और प्रक्रिया पर कार्यशाला :** प्रदर्शनी के दूसरे दिन 23 नवंबर को विदर्भ में दुग्ध उत्पादन और प्रक्रिया विषय पर कार्यशाला का आयोजन कविवर्य सुरेश भट सभागृह में सुबह 11 बजे किया गया है। प्रदर्शनी के उद्घाटन कार्यक्रम की अध्यक्षता केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी करेंगे। केंद्रीय पशुधन दुग्ध विकास और मत्स्य पालन मंत्री गिरीराज सिंह प्रमुख अतिथि के रूप में उपस्थित रहेंगे। एनडीडीबी के अध्यक्ष दिलीप रथ इस दौरान संबोधित करेंगे। प्रमुखता से पशुधन विभाग के सचिव अतुल चतुर्वेदी, कृषि विशेषज्ञ नियुक्ति मंडल के अध्यक्ष डॉ. ए.के. मिश्रा, माफसु के कुलगुरु डॉ. आशीष पातुरकर उपस्थित रहेंगे।

**24 को फूड प्रोसेसिंग पर एक दिवसीय परिषद :** उसी प्रकार 24 नवंबर को 'फूड प्रोसेसिंग में विदर्भ के सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगों के लिए अवसर' विषय पर एक दिवसीय परिषद का आयोजन सुरेश भट सभागृह में सुबह 10 बजे से किया जा रहा है। परिषद में केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थित रहेंगे। एमएसएमई के अतिरिक्त सचिव राममोहन मिश्रा 'सार्वजनिक खरीदी निती और एमएसएमई क्लस्टर का विकास' विषय पर मार्गदर्शन करेंगे। 'उद्योजकों को प्रोत्साहन और विकास के लिए एमएसएमई योजना' विषय पर एमएसएमई के संचालक पी.एम. पार्लेवार मार्गदर्शन करेंगे। एनएसआईसी के उपमहाव्यवस्थापक रामदेव टेकाम 'एनएसआईसी' विषय पर संबोधित करेंगे।

**PRESS INFORMATION BUREAU**
**GOVERNMENT OF INDIA**
**NAGPUR**
***

| | |
|---|---|
| **NAME OF NEWSPAPER** - | NAVBHARAT |
| **DATE** | 22·11·2019 |
| **LANGUAGE** | HINDI |
| **SUBJECT** | |

# एग्रोविजन कृषि प्रदर्शनी आज से

नागपुर. किसानों के लिए वरदान और उन्हें आधुनिक तकनीकी से रूबरू कराने वाली मध्य भारत की सबसे बड़ी कृषि प्रदर्शनी एग्रोविजन का शुभारंभ रेशिमबाग मैदान पर 22 नवंबर को दोपहर 3 बजे हो रहा है. एग्रोविजन के मुख्य प्रवर्तक तथा केंद्रीय मंत्री नितिन गडकरी की अध्यक्षता में होने वाले उद्घाटन समारंभ में केंद्रीय कृषि और किसान कल्याण मंत्री नरेंद्र सिंह तोमर प्रमुख अतिथि के रूप में उपस्थित रहेंगे. साथ ही राज्यमंत्री संजय धोत्रे, पूर्व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पूर्व वित्त मंत्री सुधीर मुनगंटीवार और चंद्रशेखर बावनकुले प्रमुखता से उपस्थित रहेंगे. यह 25 नवंबर तक चलेगी.

**PRESS INFORMATION BUREAU**
**GOVERNMENT OF INDIA**
**NAGPUR**
***

| | |
|---|---|
| NAME OF NEWSPAPER | NAVRASHTRA |
| DATE | 22.11.2019 |
| LANGUAGE | MARATHI |
| SUBJECT | |

QUICK NEWS

## ॲग्रो व्हिजन कृषी प्रदर्शनाचे आज उद्घाटन

नागपूर. शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञानाची, जोडधंद्याची माहिती व्हावी, त्याचा उपयोग त्यांच्या उत्पन्न वाढीसाठी व्हावा आणि त्यांची शेती लाभदायक व्हावी, या हेतूने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेले ॲग्रो व्हिजन कृषी प्रदर्शनाचे शुक्रवारी 22 नोव्हेंबर रोजी दुपारी 3 वा. उद्घाटन होईल. स्थानिक रेशीमबाग मैदानावर सुरू होत असलेल्या या कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांच्या हस्ते होईल. याप्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित राहतील. ॲग्रोव्हिजनच्या कार्यक्रमाला राज्यमंत्री संजय धोत्रे, माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि माजी ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती राहणार आहे.

**PRESS INFORMATION BUREAU**
**GOVERNMENT OF INDIA**
**NAGPUR**
***

| | |
|---|---|
| NAME OF NEWSPAPER | DESHONNATI |
| DATE | 22.11.2019 |
| LANGUAGE | MARATHI |
| SUBJECT | |

# आजपासून ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शन

## केंद्रीय कृषीमंत्री तोमर, ना. गडकरी, ना. संजय धोत्रे यांची उपस्थिती

प्रतिनिधी/२१ नोव्हेंबर

**नागपूर :** विदर्भातील शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान, जोडधंद्यांची माहिती व्हावी त्याचा उपयोग त्यांच्या उत्पन्नवाढीसाठी व्हावा आणि त्यांची शेती लाभदायक व्हावी या हेतूने केंद्रीय परिवहन मंत्री ना.नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन उद्या शुक्रवार दि. २२ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता रेशीमबाग मैदानावर होणार आहे. २२ ते २५ नोव्हेंबर पर्यंत यानिमित्ताने शेतकऱ्यांसाठी विविध कार्यशाळा, तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे.

ना.नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या उद्घाटन कार्यक्रमाला केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री नरेंद्र सिंह तोमर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. केंद्रीय मनुष्यबळ विकास, दूरसंचार व माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री संजय धोत्रे, राज्यांचे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि माजी ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे.

### उद्या दुग्धोत्पादन विकास व प्रक्रिया परिषद

२३ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता ***(उर्वरित वृत्त पान ५ वर)***

## आजपासून ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शन

कविवर्य सुरेश भट सभागृह येथे गुजरातच्या आनंदस्थित नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डच्या सहयोगाने 'विदर्भातील दुग्धोत्पादनाचा विकास व प्रक्रिया परिषद' या कार्यशाळेचे उद्घाटन केंद्रीय पशुसंवर्धन दुग्धविकास मंत्री गिरिराज सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. याप्रसंगी राष्ट्रीय डेअरी विकास मंडळाचे अध्यक्ष दिलीप रथ, दुग्धविकास विभागाचे केंद्रीय सचिव अतुल चतुर्वेदी, कृषी वैज्ञानिक निवड मंडळाचे अध्यक्ष डॉ. ए.के. मिश्रा व महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आशिष पातुरकर उपस्थित राहणार आहेत. यावर्षी प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण पशुधन आणि एम. एस. एम. ई. दालन असणार आहे. सुमारे दहा हजार चौरस मीटर जागेवर प्रदर्शनाचे डोम, ४ हजार चौरस मीटरचे ओपन हँगर उभारण्यात आले असून कार्यशाळांसाठी १२०० चौरस मीटरचे तीन हॉल्स आणि १५०० चौरस मीटरचे पशुधन दालन असा एकंदर १७ हजार चौरस मीटर परिसर प्रदर्शनाने सज्ज झाला आहे. दोन एकदिवसीय परिषदांसह विविध विषयांवर कार्यशाळा होणार आहेत. शेतकऱ्यांच्या नोंदणीसाठी दोन काऊंटर्स तयार करण्यात आले आहेत. समारोप २५ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण राज्यमंत्री कैलास चौधरी, उत्तर प्रदेशचे कृषीमंत्री सूर्यप्रताप साही आदी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
NAGPUR
***

| | |
|---|---|
| NAME OF NEWSPAPER | SAKAL |
| DATE | 22.11.2019 |
| LANGUAGE | MARATHI |
| SUBJECT | |

# ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शन आजपासून

## केंद्रीय कृषिमंत्री तोमर यांच्या हस्ते उद्‌घाटन

नागपूर, ता. २१ : विदर्भातील शेतकरी सक्षम व्हावा यासाठी होणाऱ्या ॲग्रोव्हिजन राष्ट्रीय कृषी प्रदर्शनाचे उद्‌घाटन केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंग तोमर यांच्या हस्ते दुपारी तीन वाजता होणार आहे. उद्‌घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मुख्य प्रवर्तक व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी राहतील.

कार्यक्रमाला केंद्रीय मनुष्यबळ विकास, दूरसंचार व माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री संजय धोत्रे, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि माजी ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित राहतील. याशिवाय सीसीएफआय आणि यूपीएल समूहाचे अध्यक्ष श्री. रज्जुभाई श्रॉफ, खासदार पद्मश्री डॉ. विकास महात्मे आणि खासदार कृपाल तुमाने व नवनियुक्त महापौर संदीप जोशी उपस्थित राहतील. प्रदर्शनासाठी दहा हजार चौरस


नितीन गडकरी


नरेंद्रसिंग तोमर

मीटरचा डोम उभारण्यात आला आहे. उपकरणांसाठी ४ हजार चौरस मीटरचे ओपन हँगर उभारण्यात आले आहे. तसेच शेतकऱ्यांच्या कार्यशाळांसाठी १२०० चौरस मीटरचे तीन हॉल्स व १५०० चौरस मीटरचे पशुधन दालन उभारण्यात आले आहे. यात बियाणे, खते, कृषीविषयक उपकरणे, आधुनिक कृषी उपकरणांची माहिती देणारे स्टॉल्स, नाबार्डसह इतर बँक्स आणि कृषीविषयक सरकारी विभागांचे स्टॉल ॲग्रोव्हिजनमध्ये राहतील. दोन दिवस शेतकरी परिषदा व कार्यशाळांचे होणार आहेत, अशी माहिती ॲग्रो व्हिजनचे संयोजक डॉ. गिरीश गांधी, सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. सी. डी. मायी, सचिव रमेश मानकर, रवी बोरटकर व मध्यम, लघू आणि सूक्ष्म उद्योगाचे विभागीय संचालक पी. एम. पार्लेवार यांनी दिली. ऊस उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान, दुग्धव्यवसाय, फुलशेती, हळद व आले लागवड, संत्रा उत्पादन आणि प्रक्रिया, सेंद्रिय शेती, मत्स्यपालन, कुक्कुटपालन अशा विविध विषयांवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. विदर्भातील दुग्ध विकास आणि प्रक्रिया उद्योग तसेच, विदर्भातील कृषी आणि अन्न प्रक्रिया उद्योगक्षेत्रात मध्यम, लघू आणि सूक्ष्म उद्योगांना संधी या विषयांवर एकदिवसीय परिषदा कविवर्य सुरेश भट सभागृहात होतील. शेतकऱ्यांनी कृषी प्रदर्शनाला मोठ्या संख्येने भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**PRESS INFORMATION BUREAU**
**GOVERNMENT OF INDIA**
**NAGPUR**
***

| | |
|---|---|
| NAME OF NEWSPAPER - | PUNNYA NAGARI |
| DATE | 22.11.2019 |
| LANGUAGE | MARATHI |
| SUBJECT | |


# ॲग्रो व्हिजन कृषी प्रदर्शनीचे आज उद्‌घाटन

## चार दिवस चालणाऱ्या प्रदर्शनीत विविध कार्यक्रमांचे आयोजन

नागपूर : रेशीमबाग मैदानावर २२ ते २५ नोव्हेंबरपर्यंत ॲग्रो व्हिजन कार्यशाळा, राष्ट्रीय कृषी प्रदर्शन आणि परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. चार दिवस चालणाऱ्या ॲग्रोव्हिजनचे उद्‌घाटन २२ नोव्हेंबरला दुपारी ३ वाजता ॲग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात येईल.

२३ नोव्हेंबरला सुरेश भट सभागृहात 'विदर्भातील दुग्धउत्पादन आणि दुग्ध प्रक्रिया' या विषयावर एक दिवसीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. सकाळी ११ वाजता परिषदेचे उद्‌घाटन ॲग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी करतील. प्रामुख्याने केंद्रीय पशुधन दुग्धविकास आणि मत्स्यपालनमंत्री गिरीराज सिंह, एनडीडीबीचे अध्यक्ष दिलीप रथ, केंद्रीय पशुधन विभागाचे सचिव अतुल चतुर्वेदी, कृषी शास्त्रज्ञ नेमणूक मंडळाचे अध्यक्ष डॉ. ए.के. मिश्रा, माफ्सूचे कुलगुरु डॉ. आशीष पातुरकर उपस्थित राहतील. परिषदेत 'विदर्भातील दुग्धोत्पादन विकासाच्या संधी आणि प्रश्न' या विषयावर आणि 'दुधाळ जनावरांच्या जाती, चारा आणि दुग्धजन्य पदार्थ' या विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शक शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. परिषदेत शेतकऱ्यांना तज्ज्ञांसोबत प्रश्नोत्तराने संवाद साधता येणार असल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

२४ नोव्हेंबरला 'अन्न प्रक्रिया उद्योगक्षेत्रात मध्यम, लघु आणि सूक्ष्म उद्योगांना संधी' या विषयावर एक दिवसीय परिषद सुरेश भट सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. सकाळी १० वाजता उद्‌घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक आणि केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांची उपस्थिती राहील. मुख्य वक्ता म्हणून एमएसएमईचे अतिरिक्त सचिव राममोहन मिश्रा 'सार्वजनिक खरेदी धोरण आणि एमएसएमई क्लस्टरचा विकास' विषयावर मार्गदर्शन करतील. परिषदेच्या दुसऱ्या सत्रात 'उद्योजकांना प्रोत्साहन आणि विकास यासाठी एमएसएमई योजना', 'अन्न प्रक्रिया उद्योगात एमएसएमई योजना', 'वाईन उद्योगातील प्रक्रिया क्षेत्रातील संधी' आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात येईल.

**PRESS INFORMATION BUREAU**
**GOVERNMENT OF INDIA**
**NAGPUR**
***

| | |
|---|---|
| NAME OF NEWSPAPER | MAHARASHTRA TIMES |
| DATE | 22.11.2019 |
| LANGUAGE | MARATHI |
| SUBJECT | |

# ॲग्रोव्हिजन आजपासून; कृषिमंत्री येणार

म. टा. प्रतिनिधी, नागपूर



विदर्भातील शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञानाची, जोडधंद्याची माहिती व्हावी, त्याचा उपयोग त्यांच्या उत्पन्नवाढीसाठी व्हावा आणि त्यांची शेती लाभदायक व्हावी, या हेतूने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेले ॲग्रोव्हिजन कृषिप्रदर्शन २२ नोव्हेंबरपासून रेशीमबाग मैदानावर सुरू होत आहे. केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांच्या हस्ते दुपारी ३.३० वाजता कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित राहतील.

नरेंद्रसिंह तोमर

रेशीमबाग मैदानावर २२ नोव्हेंबर रोजी सुरू होत असलेल्या ॲग्रोव्हिजन राष्ट्रीय कृषी प्रदर्शनात दोन एकदिवसीय परिषदांसह विविध विषयांवर विस्तृत कार्यशाळा होणार आहेत. देशातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि यशस्वी शेतकऱ्यांच्या यशोगाथांपासून प्रेरणा घेण्याची संधी यातून शेतकऱ्यांना मिळणार आहे. शेतकऱ्यांसाठी उपयुक्त अशा अनेक विषयांवर कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत. त्यापैकी काही कार्यशाळा या जास्त कालावधीसाठी असतील. यात ऊसउत्पादन वाढीचे तंत्रज्ञान, दुग्धव्यवसाय, फुलशेती, हळद व आले लागवड, संत्रा उत्पादन आणि प्रक्रिया, सेंद्रिय शेती, मत्स्यपालन (मत्स्यशेती आणि निर्यात संधी), कुक्कुटपालन, सिंचन यासोबतच लहान शेतकऱ्यांना उत्पन्नवाढीची संधी असणाऱ्या मधमाशी पालन, रेशीम शेती, हरितगृह तंत्रज्ञान व शेड नेट, कृषी वित्तपुरवठा, ॲग्री टुरिझम, सरकारी योजना, जलव्यवस्थापन या आणि अशा अनेक विषयांचा समावेश आहे. करवंद लागवड आणि विक्रीच्या संधी हा नवा विषय कार्यशाळेत असेल.

**अत्याधुनिक सुविधांनी सज्ज**

शेतकरी, शेतीतज्ज्ञ आणि कृषिप्रेमी अशा एकूण मांदियाळीसाठी दहा हजार चौरस मीटर जागेवर प्रदर्शनाचे डोम, मोठ्या उपकरणांसाठी ४ हजार चौरस मीटरचे ओपन हँगर, उभारण्यात आले असून कार्यशाळांसाठी १,२०० चौरस मीटरचे तीन हॉल्स आणि १५०० चौरस मीटरचे पशुधन दालन असा एकंदर १७ हजार चौरस मीटर परिसर प्रदर्शनाने व्याप्त आहे.

## ३५० स्टॉल्सवर कृषिदर्शन

सहा डोममधून सुमारे ३५० स्टॉल्स कृषिप्रदर्शनात राहतील. शिवाय, शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद मिळत असलेल्या पशुधन दालनाचेही आयोजन असून, यावर्षीही जातिवंत पशूंची संपूर्ण माहिती या प्रदर्शनात मिळेल. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या नावनोंदणीसाठी दोन काउंटर्स तयार करण्यात आले असून, विदर्भातील दुग्धविकास आणि प्रक्रिया उद्योग तसेच, विदर्भातील कृषी आणि अन्न प्रक्रिया उद्योगक्षेत्रात मध्यम, लघु आणि सूक्ष्मउद्योगांना संधी या विषयांवर एकदिवसीय परिषदांचे आयोजन कविवर्य सुरेश भट सभागृहात करण्यात आले आहे. सोबतच, शेतकऱ्यांसाठी बियाणे, खते, कृषिविषयक उपकरणे, आधुनिक कृषी उपकरणांची माहिती देणारे स्टॉल्स, नाबार्डसह इतर बँक्स आणि कृषिविषयक सरकारी विभागांचा ॲग्रोव्हिजनमध्ये समावेश असेल.

## फडणवीस, मुनगंटीवारांची उपस्थिती

ॲग्रोव्हिजन कृषिप्रदर्शनाच्या उद्घाटन कार्यक्रमाला केंद्रीय मनुष्यबळ विकास, दूरसंचार व माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री संजय धोत्रे, राज्याचे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि माजी ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती राहणार आहे. तसेच, सीसीएफआय आणि यूपीएल समुहाचे अध्यक्ष रज्जुभाई श्रॉफ, राज्यसभेचे खासदार पद्मश्री डॉ. विकास महात्मे आणि रामटेकचे खासदार कृपाल तुमाने, नागपूरचे महापौर संदीप जोशी यांची विशेष उपस्थिती राहील.

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
NAGPUR
***

| | |
|---|---|
| NAME OF NEWSPAPER | TARUN BHARAT |
| DATE | 22.11.2019 |
| LANGUAGE | MARATHI |
| SUBJECT | |






ॲग्रो व्हिजनमध्ये होणाऱ्या कृषी प्रदर्शनासाठी रेशीमबाग मैदान सज्ज झाले असून, प्रदर्शनासाठीचे डोम आणि स्टॉल्स आकारास येऊ लागले आहेत.

# ॲग्रो व्हिजनमध्ये कार्यशाळांचे भरगच्च आयोजन

**नागपूर, २१ नोव्हेंबर**

ॲग्रो व्हिजन या चार दिवस चालणाऱ्या कृषी प्रदर्शनामध्ये कृषीसंबंधित कार्यशाळांचे भरगच्च आयोजन करण्यात आले असून, शनिवार २३ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता कविवर्य सुरेश भट सभागृहात कार्यशाळा व परिषदेचे उद्घाटन करण्यात येईल. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तर प्रमुख अतिथी म्हणून पशुसंवर्धन मंत्री गिरीराज सिंह, राष्ट्रीय डेअरी विकास मंडळाचे अध्यक्ष दिलीप रथ, अतुल चतुर्वेदी, डॉ. ए. के. मिश्र, डॉ. आशीष पातुरकर व डॉ. सी. डी. मायी उपस्थित राहतील.

रविवार २४ नोव्हेबर रोजी देखील सकाळी १० वाजता कविवर्य सुरेभ भट सभागृहात परिषदेचे उद्घाटन करण्यात येणार आहे. सोमवार २५ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता रेशीमबाग मैदान येथे ॲग्रो व्हिजनचा समारोपीय कार्यक्रम पार पडेल. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तर प्रमुख अतिथी म्हणून राज्यमंत्री कैलास चौधरी, कृषी मंत्री उत्तरप्रदेश सूर्यप्राप्त साही व माजी खा. विजय दर्डा उपस्थित राहतील. या सोहळ्यात शेतकरी व कृषी उद्योजकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**शेतकऱ्यांसाठी तीन दिवस कार्यशाळा**

ॲग्रो व्हिजनमध्ये २३, २४ आणि २५ नोव्हेंबर रोजी तीन दिवस भरगच्च कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. विभिन्न विषयांवरील या कार्यशाळांमध्ये देशातील नामवंत कृषीतज्ज्ञांचा सहभाग राहणार आहे. जनतेने या निःशुल्क कार्यशाळांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**२३ नोव्हेंबर** : सभागृह क्रमांक १ - दुपारी १२.३० वा. मधमाशी पालन, दुपारी १.३० वा. कृषी वित्त पुरवठा, दुपारी ३ वा. कापसाच्या व्यवहाराबाबत जागरुकता, दुपारी ४ वा. कापसाचे जास्तीत जास्त उत्पादन, सायंकाळी ५ वा. वैद्यकीय कापूस, सभागृह क्रमांक २ - दुपारी १२ वा. रेशीम शेती, दुपारी १.३० वा. बेहंगामी भाजीपाला उत्पादन, दुपारी २.३० वा. सेंद्रीय शेती, सभागृह क्रमांक ३ - दुपारी १२ वा. हरितगृह तंत्रज्ञान अणि नेटशेड, दुपारी १ वा. फुलशेती, दुपारी २ वा. जवस उत्पादन आणि मुल्य वर्धन, दुपारी ३ वा. रासायनिक खतांचा वापर आणि दुपारी ४ वा. कृषी पर्यटन.

**२४ नोव्हेंबर** : सभागृह क्रमांक १ - दुपारी १२ वा. डेअरी, दुपारी ३ वा. हायड्रोपोनिक्स, दुपारी ४.३० वा. शेळीमेंढी पालन, सभागृह क्रमांक २ - दुपारी १२ वा. संत्री उत्पादन आणि प्रक्रिया, दुपारी २ वा. गटशेती, दुपारी ३ वा. हळद आणि आले उत्पादन आणि प्रक्रिया, सभागृह क्रमांक ३ - दुपारी १२ वा. पावसाच्या पाण्याचे संवर्धन, साठवण अणि पुनर्भरण, दुपारी २ वा. कृषी रसायनाचा योग्य उपयोग, दुपारी ३ वा. कुक्कुटपालन.

**२५ नोव्हेंबर** : सभागृह क्रमांक १ - दुपारी १२ वा. बांबू उत्पादन व संधी, सभागृह क्रमांक २ - दुपारी १२ वा. शेतीचे यांत्रिकीकरण, दुपारी २ वा. यशोगाथा लिंबू-सीताफळ-शेवगा-करवंद, सभागृह क्रमांक ३ - दुपारी १२ वा. मत्स्यपालन, दुपारी २ वा. सुक्ष्म सिंचनाच्या आधुनिक पद्धती आणि दुपारी ३ वा. जलयुक्त शिवार. *(तभा वृत्तसेवा)*